PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिद्धीकरिता**

# पार्ले महोत्सवात सहभाग घेताना अत्यंत आनंद झाला- आदित्य ठाकरे

मुंबई दि २५: पार्ले महोत्सव हा अतिशय अनोखा उपक्रम असून इथे सहभागी होताना मला अत्यंत आनंद होत असल्याचे युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी म्हटले. एकाच परिसरामध्ये विविध प्रकारच्या ३८ स्पर्धांमधून हजारो लोक एकत्र येताना क्वचितच पहायला मिळते, असे सांगत तरुणांना संधी दिल्याबाबत ॲड.पराग अळवणी यांचे अभिनंदन केले. विशेष म्हणजे मलाही इथे खेळावेसे वाटत असल्याचे सांगत व्यासपीठावरुन उतरुन स्वतः क्रिकेट खेळले, तसेच वॉलीबॉल, मल्लखांब, कबड्डी अशा खेळांचे सामने जवळून पाहिले.

आदित्य ठाकरे यांनी केवळ फेसबुक वरील निमंत्रण स्वीकारल्याचा पराग अळवणी यांनी केलेल्या कौतुकाचा उल्लेख करत आपण तरुणांशी संवाद साधायला सदैव तत्पर असल्याचे त्यांनी सांगितले. येथील उपस्थितांपैकी किती जण फेसबुकवर आहेत असे त्यांनी विचारताच मैदानावरील सुमारे पाच हजार तरुणांनी हात वर केले. तेव्हा कोणतीही समस्या किंवा काम असल्यास आपण मला फेसबुकवर संपर्क साधा असे आवर्जुन सांगितले.

१४ व्या पार्ले महोत्सवाच्या सातव्या दिवशी सर्वात विशेष आकर्षण ठरली ती मल्लखांब स्पर्धेतील जपानी स्पर्धक कॅको व अर्जेंटिनाचा निकोलस सॅडझ या दोघांनी मराठमोळा मल्लखांब करून दाखवले तेव्हा उपस्थित क्रिडारसिक अवाक झाले तर नंदिनी वायकर ही ६ वर्षिय कन्या खास दुबई येथून पार्ले महोत्सवमधील नृत्य स्पर्धाकरिता सुट्टी घेऊन आलेली आहे. तसेच वॉलीबॉल व थ्रोबॉल स्पर्धांमधील केरळ, तामिळनाडू, कर्नाटक येथील राष्ट्रीय खेळाडू तसेच महाराष्ट्रातील सांगली, सातारा, पुणे, धुळे, नागपूर व संभाजी नगर येथील बलाढ्य संघानीही क्रिडा रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावर्षी वॉलीबॉलमध्ये ११६, कबड्डीमध्ये १६० तर फुटबॉलमध्ये ९० अशा विक्रमी संख्येत संघांनी सहभाग घेतला आहे. तसेच बुद्धीबळ, बॅडमिंटनसह सर्व इन्डोअर खेळांमध्येसुध्दा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पार्ले महोत्सवामधील नृत्य, समूहनृत्य, स्वरचित काव्य वाचन अशा स्पर्धांनाही ७ व्या दिवशी सरूवात झाली असुन, सर्वंच स्पर्धांमध्ये सुमारे ४ हजार स्पर्धक सहभागी झाले आहेत. आत्तापर्यंत चित्रकला, व्यंगचित्र, मेहंदी इत्यादी कला स्पर्धांमध्येही सुमारे ५ हजार स्पर्धक सहभागी झाले आहेत. एकूणच १४ व्या पार्ले महोत्सवास महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच अन्य काही राज्यांमधून तर प्रतिसाद लाभला आहेच परंतु दुबई, जपानहून सुध्दा स्पर्धक आल्याचा आनंद प्रमुख आयोजक ॲड. पराग अळवणी यांनी व्यक्त केला.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.